नाशिक
दि.२१/१२/२०२१

# प्रेसनोट

## आलोसे महेश रमेश महाले, ग्रामसेवक, ग्रामपंचायत निमगांव मड, ता.येवला, जि. नाशिक २०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | येवला शहर पोलीस स्टेशन जि. नाशिक गु.र.नं.४६७/२०२१, दि.२१.१२.२०२१ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन–१९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपींचे नांव व कार्यालय** | महेश रमेश महाले, ग्रामसेवक, ग्रामपंचायत निमगांव मड, ता.येवला, जि. नाशिक |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०,०००/— रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ००/— रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे अधिकृत बांधकाम ठेकेदार असून त्यांनी ग्रामपंचायत निमगांव मड, ता.येवला,जि.नाशिक येथे जनसुविधा योजने अंतर्गत स्मशानभूमीच्या कामाचे बील मंजूर झाल्याचे मोबदल्यात तसेच तक्रारदार यांची अनामत रक्कम परत करण्यासाठी आलोसे महेश रमेश महाले, ग्रामसेवक, ग्रामपंचायत निमगांव मड, ता.येवला, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि.नाशिक पथकाने दि.१२/११/२०२१ रोजी सापळापुर्व पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे महेश रमेश महाले, ग्रामसेवक, ग्रामपंचायत निमगांव मड, ता.येवला, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडून पंच व साक्षीदारांसमक्ष ८०,०००/— रुपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती **२०,०००/—रुपये लाचेची मागणी** करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द येवला शहर पोलीस स्टेशन जि. नाशिक गु.र.नं.४६७/२०२१ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन–१९८८ चे कलम ७ प्रमाणे आज दि.२१/१२/२०२१ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई–मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

( सतिश भामरे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक